**ठळक बातम्या**

- शहर आणि गावातली दरी दूर करुन आर्थिक समावेशनासाठी वित्तविषयक तंत्रज्ञानाने मोलाची कामगिरी बजावली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- महाराष्ट्रात वाढवण इथं उभारण्यात येणाऱ्या खोल पाण्यातल्या सर्वात मोठ्या बंदराचं आज प्रधानमंत्री करणार भूमीपूजन
- भारताचा जीडीपी वाढीचा दर चालू वर्षात ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील असा मूडीजचा अंदाज
- महाराष्ट्रात राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा पडल्या प्रकरणी एका आरोपीला अटक

**आणि**

- अरबी समुद्रात असना चक्रीवादळाची चाहूल

**<><><><><>**

शहर आणि गावातली दरी दूर करुन आर्थिक समावेशनासाठी वित्तविषयक तंत्रज्ञानाने मोलाची कामगिरी बजावली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. वित्त आणि तंत्रज्ञान विषयक ग्लोबल फिनटेक फेस्ट ला आज मुंबईत ते संबोधित करत होते. गेल्या १० वर्षांत ३१ अब्ज डॉलरची गुंतवणूक फिनटेकमध्ये झाली असून फिनटेक स्टार्टअप्समध्ये ५०० टक्के वाढ झाल्याचं त्यांनी सांगितलं. बँक व्यवहारांचं संगणकीकरण झालं, गेल्या १० वर्षात ५३ कोटी जनधन खाती उघडली गेली त्यात २९ कोटींपेक्षा जास्त खाती महिलांची आहेत असं सांगून ते म्हणाले की फिनटेकमुळे महिला सक्षमीकरणालाही हातभार लागला आहे. थेट लाभ हस्तांतरण होत असल्याने भ्रष्टाचाराला जागी राहिली नाही असं मोदी यांनी सांगितलं.

भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास आणि इन्फोसिसचे

सहसंस्थापक क्रिश गोपालकृष्णन यांचीही भाषणं कार्यक्रमात झाली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून पालघर इथं आज विविध विकासकामांचं उद्घाटन आणि भूमिपूजन करणार आहेत. डहाणू गावात ७६ हजार कोटी रुपयांच्या वाढवण बंदराचं भूमिपूजन त्यांच्या हस्ते होईल. आशिया खंडातलं हे खोल पाण्यातलं सर्वात मोठं बंदर असेल आणि जगातल्या आघाडीच्या १० बंदरामध्ये याचा समावेश असेल. या बंदरामुळे १२ लाख लोकांना प्रत्यक्ष तसंच अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे.

पालघरमधे उभारण्यात येणारं वाढवण बंदर देशाच्या विकासात भरीव योगदान देईल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. खोल पाण्यातलं सर्वात मोठं बंदर असून त्यामुळे देशाच्या विकासकार्यात महाराष्ट्र अग्रभागी असल्याचं अधोरेखित होतं असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारताचा जीडीपी वाढीचा दर चालू वर्षात ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील असा अंदाज मूडीज या पतमानांकन संस्थेनं वर्तवला आहे. यापूर्वी या वर्षासाठी भारताचा जीडीपी वाढीचा दर ६ पूर्णांक ८ दशांश टक्के राहील असा मूडीजचा अंदाज होता. २०२५ साठीचा सुधारित अंदाजही मूडीजने प्रसिद्ध केला आहे. पुढच्या वर्षात भारताचा जीडीपी वाढीचा दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांऐवजी ६ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील असं सुधारित अंदाजात म्हटलं आहे. २०२४ च्या पहिल्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ ७ पूर्णांक ८ दशांश टक्के दरानं झाली. औद्योगिक आणि सेवा क्षेत्राने लक्षणीय वाढ नोंदवल्याचं मूडीजचं निरीक्षण आहे.

**<><><><><>**

वक्फ घटनादुरुस्ती विधेयक २०२४ च्या अभ्यासासाठी नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीची बैठक आज नवी दिल्लीत सुरु आहे. यामध्ये संबंधितांची मतं जाणून घेतली जात असून आज मुंबईच्या ऑल इंडिया सुन्नी जमायुतुल उलेमा आणि नवी दिल्लीच्या इंडियन मुस्लीमस फॉर सिविल राईट्स या संघटनांचे प्रतिनिधी समितीसमोर आपलं म्हणणं मांडत आहेत. वक्फ च्या कायदादुरुस्तीसाठी या संयुक्त संसदीय समितीची स्थापन करण्यात आली असून समितीची पहिली बैठक या महिन्यात २२ ऑगस्ट रोजी झाली होती. या समितीमध्ये एकूण ३१ सदस्य आहेत.

**<><><><><>**

शिक्षण मंत्रालयानं शालेय शिक्षणातल्या विविध भाषांचा वापर त्याचप्रमाणे लहान मुलांना स्थानिक भाषेमधून देण्यात येणाऱ्या शिक्षणासदर्भात काल नवी दिल्लीत एक महत्त्वपूर्ण बैठक झाली. शालेय शिक्षण विभागाचे सचिव संयज कुमार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीला ज्येष्ठ अधिकारी आणि शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक भाषेचं ज्ञान असणं व्यक्तीमत्त्व विकासासाठी आणि परस्पर संवादासाठी आवश्यक असून विद्यार्थी कोणतेही शिक्षण आपल्या मातृभाषेतून लवकर शिकू शकतात असं मंत्रालयानं यावेळी म्हटलं आहे.

**<><><><><>**

सीमा भागात शांतता राखण्याबद्दल भारत आणि चीनदरम्यान सहमती झाली आहे. भारत-चीन सीमा प्रश्नविषयक सल्लामसलत आणि समन्वयासाठी कार्यरत संयुक्त यंत्रणेची ३१वी बैठक काल चीनमध्ये बीजिंग इथं पार पडली. या बैठकीत यावर सहमती झाली. सीमा भागात शांतता प्रस्थापित करणं आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचा आदर राखणं, ही बाब दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध पूर्वपदावर आणण्यासाठीचा आधारभूत मुद्दा असल्याचा पुनरुच्चारही दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनी केला.

बैठकीत भारताच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व परराष्ट्र मंत्रालयाचे, पूर्व आशिया क्षेत्रासाठीचे सह सचिव गौरंगलाल दास यांनी केलं, तर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या सीमा आणि महासागर व्यवहार विभागाचे महासंचालक होंग लियांग यांनी चीनी शिष्टमंडळाचं नेतृत्व केलं.

<><><><><>

सिंधुदुर्गात मालवण इथल्या राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा पडल्याच्या प्रकरणात पोलिसांनी चेतन पाटील या एका आरोपीला अटक केली आहे. चेतन याला कोल्हापुरातून ताब्यात घेतल्याचं सिंधुदुर्ग पोलिसांनी सांगितलं. चेतन पाटील हा पुतळा बनवण्याचं कंत्राट दिल्या गेलेल्या मेसर्स आर्टिस्ट या कंपनीचा सल्लागार म्हणून काम पाहात होता. या कंपनीचा मालक आणि पडलेल्या मुर्तीचा शिल्पकार जयदीप आपटे हा या प्रकरणातला दुसरा आरोपी असून, तो अद्यापही फरार आहे.

<><><><><>

सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीनं आखाती देशांतून कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्कर जसमीत हकीमजादा प्रकरणी काल देशभरात दिल्ली, अमृतसर, जालंधर, मुंबई, सोलापूर आणि इंदूर अशा दहा ठिकाणी छापे टाकले. अमेरिकेच्या फॉरेन नार्कोटिक्स किंगपिन डेजिगेशन ॲक्टअंतर्गत 'महत्त्वपूर्ण परदेशी अंमली पदार्थ तस्कर' म्हणूनही त्याची नोंद आहे. पी एम एल ए कायद्यातील तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली. दुबईत राहणारा जसमीत भारतात अंमली पदार्थांचा अवैध व्यापार चालवत असल्याचं  ईडीच्या तपासात निष्पन्न झालं आहे.

<><><><><>

भारतीय जनता पार्टीच्या निवडणूक विषयक केंद्रीय समितीची बैठक नवी दिल्लीतल्या पक्षाच्या मुख्यालयात काल संध्याकाळी झाली. या बैठकीला

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा, पक्षाचे हरियाणा निवडणूक प्रभारी आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यासह पक्षाचे इतर वरिष्ठ नेते उपस्थित होते. आगामी हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावं निश्चित करण्यासाठी ही बैठक झाली.

**<><><><><>**

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेमध्ये रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एब्डेन या भारतीय-ऑस्ट्रेलियन जोडीनं पुरुष दुहेरीच्या पहिल्या सामन्यात रॉबिन हासे आणि सँडर अरेंड्स या नेदरलँड्सच्या जोडीचा ६-३, ७-५ असा पराभव केला. दुसऱ्या मानांकित भारतीय-ऑस्ट्रेलियन जोडीचा सामना आज दुसऱ्या फेरीत आर. कार्बालेस आणि एफ. कोरिया यांच्याशी होणार आहे. मिश्र दुहेरीत रोहन बोपण्णा आणि इंडोनेशियाच्या अल्डिला सुतजियादी यांच्यात लढत होणार आहे.

**<><><><><>**

अरबी समुद्रात ईशान्येकडे 'असना' हे चक्रीवादळ तयार होत आहे, सध्या निर्माण झालेलं कमी दाबाचे क्षेत्र गुजरातच्या पश्चिम-नैऋत्य दिशेला दाखल झालं असून, येत्या १२ तासांमध्ये त्याचं चक्रीवादळात रूपांतर होईल, अशी शक्यता भारतीय हवामान शास्त्र विभागानं वर्तवली आहे. मान्सूनमध्ये चक्रीवादळ तयार होणं ही दुर्मीळ बाब असून, याआधी १९६४ साली ऑगस्ट महिन्यात अरबी समुद्रात चक्रीवादळ तयार झालं होतं.

सुरुवातीला हे चक्रीवादळ पश्चिम-नैऋत्येकडे आणि त्यानंतर कच्छ किनाऱ्याकडे सरकेल. कच्छच्या किनाऱ्यावरून हे चक्रीवादळ ईशान्य अरबी समुद्रात पाकिस्तानच्या दिशेनं सरकेल अशी शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

सौराष्ट्र, कच्छ आणि दक्षिण गुजरात मध्ये ताशी ४५ ते ६५ किलोमीटर वेगानं, तर किनारपट्टीच्या भागात ताशी ६५ ते ७५ किलोमीटर वेगानं वारे वाहतील,

गुजरात आणि पाकिस्तानच्या किनारपट्टीवर समुद्र खवळलेला राहील, असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

कच्छ जिल्ह्यातल्या मांडवी, अब्दासा आणि लखपत तालुक्यांना या चक्रीवादळाचा मोठा तडाखा बसू शकतो. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सुरक्षित स्थलांतर करावं असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

सध्या कच्छ जिल्ह्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस होत आहे, तर किनारपट्टी क्षेत्रात जोरदार वाऱ्यांसह समुद्रात उंच लाटा उसळू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनी काल आपत्कालीन बैठक घेऊन चक्रीवादळाच्या संभाव्य परिस्थितीचा आढावा घेतला.

दरम्यान गुजरातमध्ये कच्छ, देवभूमी द्वारका आणि जामनगरचं क्षेत्र वगळता बहुतांश ठिकाणी इतरत्र गेल्या २४ तासांत पावसाचा जोर कमी झाल्यानं पूर परिस्थिती सुधारत होत आहे, मात्र बचाव कार्य अजूनही सुरू आहे.

//<><><><><>//